नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 21/04/2021 (बुधवार)
(सकाळ)

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर सावनेर ते खापा रोड वरील पुलीया खाली येथे दि. 20/04/2021 21.09 वा. ते 21.30 वा. सुमारास एमएच– 27/ बी एक्स– 7890 क्रमांकाच्या टिप्परचा चालक आरोपी नामे– 1) शेख वकील शेख हबीब, वय 35 वर्ष, रा. चांदुर रेल्वे जि. अमरावती व 2) मोहम्मद वासीम शेख हकीम, वय 25 वर्ष, रा. तिवसा जि. अमरावती यांनी संगनमत करून त्यांच्या ताब्यातील वाहनात विना परवाना अवैधरित्या 8 ब्रास रेती किं. 24,000/–रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण 20,24,000/–रुपयाच मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी पोउपनि विनोद मांढरे पो स्टे सावनेर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि विनोद मांढरे मो क्र. 9834222326 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. बेला :– अंतर्गत 15 कि. मी. मौजा चिमनाझरी शिवार येथे दिनांक 19/04/2021 चे 19:00 वा. ते 19. 15 वा. दरम्यान एम.एच– 40/बी.जे– 7899 क्रमांकाच्या चाकी गाडीचा चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन रोडने पायदळ जाणारा ईसमास पुरूष वय अंदाजे 50 वर्ष याला धडक दिली. या अपघातात अज्ञात इसम हा गंभीर जखमी झाल्याने उपचाराकामी पी.एच.सी. बेला येथे नेले असता रेफर केल्याने मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मोहम्मद रसिद तुर मोहम्मद मन्सुरी, वय 35 वर्षे, रा. असवारी बजरिया मोतीपुर मुजफुरपुर बिहार, ह.मु. चिमनाझरी शिवार साहेब पंजाबी ढाबा जवळ त. जि. नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो. स्टे. बेला येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 134/177, 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री ठेंगणे पो स्टे बेला मो न. 7972812569 हे करीत आहे.

2) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 10 कि. मी. मौजा मोखेबर्डी शिवार येथे दिनांक 05/02/2021 चे 08:00 वा. दरम्यान मृतक/आरोपी नामे– तुकाराम लक्ष्मण राउत, वय 40 वर्ष, रा. मोखेबर्डी हे त्यांच्या एमएच– 40/एमजे– 3511 क्रमांकाच्या मोटरसायेलने शेतातुन आपले घरी मोखेबर्डी येथे येत जात होते. त्यादरम्यान मोखेबर्डी शिवारातील गावा जवळील रोडवर त्यांच्या मोटरसायकला समोरुन अचानक जंगली डुक्कर आडवे आल्याने त्यांच्या मोटरसासकला धडक लागली. त्यामुळे तुकाराम राउत हे रस्त्यावर खाली पडल्याने त्यांच्या डोक्याला मार लागल्याने त्यांना उपचाराकरीता सरकारी दवाखाना सोमनाळा तसेच ग्रा.रु.भिवापुर येथे नेले व प्राथमिक उपचार करुन मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले. उपचारा दरम्यान दि 08/02/2021 चे रात्री 09.10 वा. त्याचा मृत्यु झाला. मेडीकल बुथ येथुन कागद पत्रे प्राप्त झाल्याने पोस्टे भिवापुरला मर्ग दाखल असुन चौकशी अहवालामध्ये

आरोपीने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगााने व निष्काळजीपणे चालवुन स्वताचे मरणास कारणीभुत ठरला आहे असे मर्ग चौकशीत निष्पन्न झाले.

सदर प्रकरणी पोहवा गणेश भुरे पोस्टे भिवापूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ), 337 भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री चनगोले 9823380815 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर